## युवा लक्ष्य बहुउद्देशिय सेवाभावी संस्था,
## अंबाजोगाई, जिल्हा- बीड.

**प्रस्तावना :-**

युवा लक्ष्य बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेची स्थापना. दि.६/०८/२०१६ रोजी करण्यात आली. भारत देश हा खंडप्राय देश आहे. आपल्या या देशात अनेक विविधता दिसून येतात. तसेच आपला देश विविध जाती, धर्म,पंथ व संस्कृतीने नटलेला दिसतो. या देशात श्रीमंत व गरीब अशी दरी दिसेल. अशा श्रीमंत व गरीब अशा प्रचंड दरीमुळे अनेक प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. या साठी सर्व सामांन्याचे प्रश्न घेउन विविध क्षेत्रात काम करण्याचे संस्थेने ठरविले आहे. लोकांचे प्रश्न हे न संपणारे असतात. म्हणुनच सामाजिक संस्था निर्माण होतात. व काही विचारांनी झपाटलेले तरुण लोकांचे प्रश्न हाती घेउन काम करीत असतात.त्याच पध्दतीने आम्ही सर्व संस्थचे अध्यक्ष, सचिव, सदस्य मिळुन काम करण्याचे ठरविले आहे. म्हणुन सामाजिक प्रश्न हाती घेवून तसेच लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी संस्था काम करत आहे. या साठी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

तसेच लोकांच्या अनेक प्रश्नावर काम करत आहोत. त्यामध्ये अल्पभूधारक शेतकरी यांना रोजगार, शेतीसाठी पाणी, जलसंधारण, पाणलोट, या विषयावर काम करणे, शेतकऱ्यांना नवनविन तंत्रज्ञानाची माहिती देणे या विषयावर काम करत आहे. शेतकरी तसेच सर्व जनतेला विजेची गरज असते. विजेचा तुटवडा जाणवत असल्यामुळे, वीज बील गरीबांना न परवडणारे झाल्यामुळे सौर उर्जे बाबत माहिती देणे. व लोकांमध्ये जनजागृती करणे. उदा. पारंपारीक उर्जा स्त्रोत्रांचे जतन करणे.

तसेच महिलांचे सबलीकरण संघटन बांधणे, त्यांना बचतगटांच्या माध्यमातून व्यवसाय प्रशिक्षण देणे. महिला व बालक यांच्या आरोग्याची काळजी घेणे, व जनजागृती करणे. तसेच आरोग्याची काळजी घेणे, शिक्षणावर भर देणे, त्यासाठी अंगणवाडी, बालवाडी स्थापन करणे.

आरोग्याविषयीची लोकांमध्ये जनजागृती करणे. रक्तदान शिबिराच्या माध्यमातुन लोकांना जागृत करुन रक्तदान करण्यास प्रोत्साहित करणे व ज्यावेळेस रक्ताचा तुटवडा जाणवेल त्यावेळेस रक्तदान शिबीर घेवून शासकिय रक्त पेढीस रक्त पूरविणे.

शेतकरी बांधवांना शेतीसाठी पिकाला पाणी देण्यासाठी नेहमीच विजेचा वापर करावा लागतो. पंरतु शेतीसाठी वीजपुरवठा व्यवस्थित होत नाही. सतत वीजेचा लपंडाव होत असतो. रात्री बेरात्री वीजपुरवठा होत असल्यामुळे शेतकऱ्यानां शेतीला पाणी देताना वन्यप्राण्यापासुन धोका असतो. त्यांचा जीव जाण्याची शक्यता असते. म्हणून शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी सौर उर्जेच्या वापर करणे, सौर उर्जा वापरणे विषयी माहिती देणे.

आजकाल समाजात खुप अंधश्रध्दा बोकाळली आहे. ती कमी करुन व लोकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणे. अंधश्रध्देपोटी होणारे खर्च, नवस फेडणे,कोंबडे, बकऱ्यांचा बळी देणे. ऋण काढुन सण करण्याची पध्दत थांबविण्या साठी प्रयत्न करणे.

या आधुनिक काळात तरुणामध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण खुप वाढले आहे. त्यासाठी आम्ही व्यसनमुक्ती करण्याबाबत शिबीर घेणे व शिबीराच्या माध्यमातुन त्यांना व्यसनापासुन मुक्त करण्याचा

प्रयत्न करत आहोत.

आपल्या देशात गावोगावी शहरो शहरी सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण खुप वाढले आहे. यामुळे या सुशिक्षीत, बेरोजगार, यूवक व यूवतीना नौकरीच्या मागे न लागता व्यवसायासाठी आमच्या संस्थेकडुन रोजगार प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम व व्यवसाय मार्गदर्शन करत आहोत.

युवक युवतींमध्ये खेळांची गोडी निर्माण करणे व त्यांच्या शारीरिक मजबूतीकडे लक्ष देणे व त्यांच्या साठी क्रिडा मंडळे स्थापन करण्यांचे लक्ष निश्चीत केले आहे. जगात पर्यावरण बदलामुळे अनेक आपत्तींना तोंड दयावे लागत आहे. यामुळे लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती केली करणे व संत तुकाराम महाराजांच्या ‘ वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ’या उक्तीप्रमाणे लोकांना वृक्ष कसे मित्र असतात. या विषयी लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम संस्था करत आहे.

ढासळत्या पर्यावरणामुळे जग अनेक संकटाना सामोरे जात आहे, त्याचा परिणाम प्राणीमात्रावर मोठ्याप्रमाणात होत आहे तसेच लोकांनाही याचा फटका बसत आहे. यांच्यावर मोठ्याप्रमाणावर, भूकंप, महापूर, वादळे, दुष्काळ, यासारख्या अपत्ती येत आहे. या आपत्ती काळात जनतेला धान्य, कपडे, संसार उपयोगी वस्तुंची मदत संस्थेमार्फत करण्यात येते. असे अनेक प्रश्न घेउन संस्था काम करत आहे.

तसेच महापुरुषांचा आदर्श डोळयासमोर नेहमी रहावा यासाठी जयंत्या, पुण्यतिथी साजऱ्या संस्थेच्या माध्यमातुन  केल्या जातात.

- आज देशात वृध्दांची संख्या वाढत आहे. त्यांच्यासाठी संस्थेकडून त्यांना मदत केली जाते.
- शासकीय सर्वेक्षणात सहभाग, अंपगांचे पुनर्वसन, सामुहिक विवाह सोहळ्यांचे आयोजित करणे.
- बालकामगारांचे पुनर्वसन करणे व त्यांना त्यांच्या पुर्वीच्या शाळेत पुनर्वसन करणे.
- शाळा बाहय मुलांचे सर्वेक्षण करणे व शाळेत प्रवेश देण्याचा प्रयत्न करणे.
- स्त्री पुरुष समानता समाजात निर्माण करण्याच्या प्रयत्न करणे. स्त्री भ्रुण हत्या थांबविण्याचे प्रयत्न  करणे.
- देशात बंधूभाव नांदण्यासाठी जाती भेद रहीत समाज निर्माण करणे.
- तसेच मानवी अवयवांचे महत्व व त्याचे दान करण्याच्या विषयी जनजागृती  करण्याचे काम संस्था करीत आहे.
- असंघटीत कामगारांचे प्रश्न घेउन काम करणे.
- तसेच शाळा, महाविदयालय येथे आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे.
- आर्थिक दृष्टया दुर्बल असलेल्या मूलासाठी शैक्षणिक निधी उपलब्ध करण्याचे काम संस्था करत आहे.
- अशा अनेक लोकांच्या प्रश्नावर संस्था खारीचा वाटा उचलत आहे. व सामाजिक प्रश्न  कमी करण्याचा आटोकाट प्रयत्न संस्थेच्या माध्यमातुंन केला जात आहे.

धन्यवाद!


अध्यक्ष
**काशिनाथ विश्वनाथ साबणे**
रा. रविवापेठ अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.
पिन कोड 431517.
महाराष्ट्र.
मोबा.नं.9766974799

सचिव
**नरेश सखाराम साबणे.**
रा. रविवारपेठ, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड.
पिन कोड 431517
महाराष्ट्र.
मोबा.नं.9766074190,9422585481

## वार्षिक अहवाल २०१८ ते २०१९

युवा लक्ष्य बहुउद्देशिय संस्थेने, अहवाल काळात सामाजिक काम करण्याचा वसा उचललेला आहे. म्हणुन प्रत्येक वर्षीच्या अहवाल काळात गरीब, होतकरु, महिला, शेतकरी, विद्यार्थी, विद्यार्थीनी, बालक-बालीका यासाठी सतत  काम करण्याचे ध्येय समोर ठेवुन संस्थेची या दिशेने वाटचाल अविरत चालु ठेवलेली आहे. याला अनुसरुन या अहवाल काळात  संस्थेकडुन खालील उपक्रम राबविण्यात आले आहेत.

### १. शालेय उपक्रमः-

अहवाल काळात संस्थेच्या वतीने शालेय उपक्रम राबविण्याचे टरविले. व या उपक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. परिसरातील विद्यार्थी शालेय साहित्याविना शाळेत जाण्याचा राहु नये, हा उद्देश समोर टेवून संस्थेच्या कार्यकर्त्यांनी दानशुर व्यक्तींकडुन शालेय साहित्य जमा केले.  व मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.



### २. फराळ वाटप उपक्रमः-



याही वर्षीच्या दिवाळीमध्ये आर्थिक वंचित, गरजु लोकांना त्यांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या तसेच शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष, सचिव व कार्यकर्ते उपस्थित होते.

**३. वृक्षारोपण कार्यक्रम उपक्रम :-**

प्रत्येक वर्षी संस्थेने पर्यावरण संरक्षण करण्याचे ठरवुन वृक्षारोपण करण्याचा उपक्रम हाती घेतला. व याही वर्षी वृक्षारोपण कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते करण्याचे काम केले. संस्थेने अहवाल काळात पर्यावरण मित्राची भूमिका निभावत वृक्षारोपण केले. या कार्यक्रमास मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी स्वत: राबुन रोपे लावण्यासाठीचे खड्डे खोदण्याचे काम केले.



**४. महिला संघटन उपक्रम:-**

एखाद्या स्त्रीवर अबला म्हणुन जेव्हा अन्याय, अत्याचार होतो. अन्याय करणारे हे अनोळखी नसतात, ते



नातेसंबंधातीलच असतात. त्याला वाचा फोडण्यासाठी नारी शक्ती निर्माण व्हावी. महिलांचे संघटन व्हावे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडावी, व तसेच समाजातील अनिष्ट, रुढी, परंपराच्या विरोधात लढा उभा रहावा, यासाठी संघटन महत्वाचे असते. तोच विचार मनात घेऊन महिलांचा मेळावा घेण्यात आला व तिळगुळ वाटप करुन, नारी शक्ती एकटवण्याचा छोटासा प्रयत्न अहवाल काळात संस्थेच्या वतीने करण्यात आला.

**५. अंगणवाडी, बालवाडी बालझुंबड उपक्रमः-**

अहवाल काळात अंगणवाडीतील, बालवाडीतील मुलामुलींना खेळ, नाच, गाणे यातुन आंनद मिळावा, त्यांच्या व्यक्तीमत्व विकासात भर पडावी, म्हणुन शहरातील अंगणवाडी/ बालवाडीत बालझुंबड उपक्रम राबविण्यात आला. मुलांच्या कला गुणांना व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. व यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वाटप करण्यात आले.



**६. महिती व तंत्रज्ञान, प्रचार व प्रसार उपक्रम :-**

या वर्षीच्या अहवाल काळात, युवा लक्ष्य बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेच्या वतीने विद्यालयात माहिती व तंत्रज्ञानाचा प्रचार करण्याच्या हेतुने उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात माहिती व तंत्रज्ञान प्रचार व प्रसारण माहिती देण्यासाठी विज्ञानाचे प्राध्यापकांना बाोलविण्यात आले. विद्यार्थ्यांना माहिती व तंत्रज्ञानाविषयी माहिती देण्यात आली, व आजच्या काळात माहिती व तंत्रज्ञानाची गरज किती मोठया प्रमाणात आहे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला व कार्यक्रम संपविण्यात आला.

**७. शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्याचा उपक्रम :**

आपल्या देशातील शेती बहुतांश बैलाच्या मदतीने केली जाते. परंपरागत शेती पध्दतीमुळे शेतकऱ्यांची मेहनत व वेळ वाया जातो. शेती हि व्यापारासाठी, उद्योग धंदा म्हणुन केली जावी. त्यामध्ये बदल व्हावेत यासाठी शेती मध्ये नव-नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी अंगीकारावे, म्हणुन संस्थेच्या वतीने शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान माहित व्हावे, यासाठी जनजागृती अभियान खेडोपाडी जावुन राबविण्यात आले. शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे, यासाठी उपक्रम घेण्यात आला. यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

**८. दारुबंदी उपक्रमः-**



कुटुंब कर्त्याच्या दारुच्या व्यसनामुळें कुटुंबाची वाताहत लागते. कमाई नसल्यामुळे मुलाबाळांना भिक मागण्याची वेळ येते. संसाराला ग्रहण लागते. दारु पिण्याच्या व्यसनामुळे अनेक संसार उघडयावर येतात. मुले बाळे शिक्षणापासुन वंचित होतात . म्हणुन अहवाल काळात संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्यकर्ते यांनी घरोघरी जावुन, ज्या ठिकाणी व्यसनी लोक राहतात. त्यांना उपदेश करुन दारुच्या व्यसनामुळे होणारे दुष्परीणाम त्यांना सांगितले. तसेच व्यसनी व्यक्तींच्या कुटुंबात जावुन, त्यांना विनंती करु व्यसनी व्यक्तीची दारु सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात आला.

**९. बालकामगार पुनर्वसन करणेः-**



अहवाल काळात संस्थेच्या कार्यकर्त्यांनी बालकामगारांचे पूनर्वसन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. या अहवाल काळात हॉटेल, विटभट्टी, खाटिकखाने, भंगार दुकान इत्यादी. ठिकाणी भेटी देवुन बालकामगार मुलांना व त्यांच्या पालकांना भेटुन त्यांचे मनपरिवर्तन केले. व मुख्याध्यापकास सांगुन त्यांचे पुर्वीच्या शाळेत पुनर्वसन करण्याचे काम दरवर्षी प्रमाणे केले गेले. याचा परिणाम म्हणुन गेल्या दोन वर्षात जवळपास ६० बालकामगारांचे पुनर्वसन करण्यात संस्थेला यश आले आहे.

**१०. असंघटीत कामगारांचे संघटन उपक्रम:**

जगात कामगार विरुध्द भांडवलदार असा संघर्ष आपणास नेहमी पहावयास मिळतो. गरीबी/ श्रीमंती या मधुन हा वर्गकलह पाहण्यास मिळतो. देशात कामगार हे प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असतात. शेती, बांधकाम, विटभट्टी, उसतोड मजुर, कारखान्यात, नगरपालीकेत अशा वेगवेगळया व्यवसायात कामगार दिसुन येतात. आणि हे सर्व असंघटित आहेत. त्यांची संघटना बांधण्याचे प्रयत्न संस्था सतत करीत आहे. कामगारांच्या मजुरीचे मुल्य किती असावे, कामाचे तास किती असावे. या विषयी कामगारांना भेटी देवुन विचारपुस केली व या प्रश्नावर मार्ग काढण्याचे प्रयत्न केले गेले.